# (०७)
# ‘स्वभावाला औषध असते,’ या पुस्तक प्रकाशन सोहळयात अध्यक्षीय

# ‘प्रत्येक वेळी योग्य पर्यायाचा विचार करुन आपण वागलात, तरच आपण यशस्वी जीवन जगू शकाल’

## प्रसंग- ‘स्वभावाला औषध असते,’ या पुस्तक प्रकाशन सोहळयात अध्यक्षीय

*दि. ०९-०३-१९९५, स्थळ -टिळक स्मारक मंदिर, पुणे*

*ज्येष्ठ विचारवंत श्री. भवरलाल जैन एक ‘बहुश्रुत’, ‘बहुआयामी’ व्यक्तिमत्त्व! स्वभावाच्या रंगबेरंगी छटा असलेल्या अनेक व्यक्ती आणि वल्लीही त्यांच्या आयुष्ययात्रेत भेटल्या. योग असा की, ‘स्वभावाला औषध असते’ हे पुस्तकही त्यांना प्रकाशनानिमित्त वाचायला मिळाले. पुस्तक प्रकाशनाला भाऊ प्रमुख अतिथी आणि सोहळा रंगला खास कान तयार झालेल्या पुण्याच्या श्रोत्यात! भाऊंनी रसिकांसमोर पुस्तकाचे मर्मग्राही विवेचन सूक्ष्मतेने केलेच शिवाय स्वभाव बदलता येतो, स्वतःला घडवता येते, याची अनेक उदाहरणेही दिलीत. ‘चारित्र्य’ बाबतही आग्रही प्रतिपादन केले. शासनाला, समाजाला एव्हढेच काय तर त्या त्या गावाला, महानगराला स्वतःची एक ‘इमेज’ असते, स्वतःचा एक स्वभाव असतो, हे ही मार्मिक शब्दात सांगितले. ‘स्वभाव’ विषयावरचे भाषण स्वाभाविकच मिस्कील तितकेच गंभीरही. आणि हसता हसता अंतर्मुख करायला लावणारेही! वेळ-काळ-परिस्थितीत स्वभाव कसे घडतात, बदलतात याचा एक सुरेख आलेखच समर्पक शब्दात भाऊ येथे रेखाटतात.*

आदरणीय व्यासपीठ आणि रसिक हो,

व्यासपीठावरील मान्यवरांचा व्यासांशी संबंध फार जवळचा आहे, हे आतापर्यंतच्या त्यांच्या विवेचनावरुन आपणा सर्वांच्या लक्षात आले असेलच. तेव्हढा माझा संबंध व्यासांशी आला नाही, परंतु मी तरीही काही सांगणार आहे.

सर्वप्रथम उशिरा आल्याबद्दल मी आपल्या सर्वांची माफी मागू इच्छितो. बाहेरगावी गेलो होतो. येत असताना वेळेचे काही गणित होते की, आपण एवढ्या वेळामध्ये तेथून टिळक स्मारक मंदिरात इथे, पुस्तक प्रकाशन सोहळ्याला पोहचू, पण एक वरात वाजत गाजत भर रस्त्यातून जात होती. लोक नाचत होते. या गडबडीत १०-१५ मिनिटे उशीर झाला.

मित्र हो, वनारसे साहेबांनी विद्येच्या ‘या माहेर घरात, नागपुरी संत्री आणि खानदेशी केळी कशासाठी बोलविली? हे माझ्या अजूनही लक्षात आलेले नाही. विद्वानांची कमतरता

पुण्यात तरी कमी नाही याबद्दल मला खात्री आहे ! कोठे असली तर ती जळगावी नक्कीच आहे, हा माझा अनुभव आहे !

'स्वभावाला औषध असते,' या पुस्तकाचे आपण बारकाईने वाचन कराल, तर एक फार चांगली गोष्ट आपल्या नजरेतून सुटणार नाही.आपण शीर्षकाविषयी आधी बोलू, शीर्षक आहे 'स्वभावाला औषध असते!' या शीर्षकानंतर शेवटी त्यांनी पूर्णविराम दिलेला नाही किंवा प्रश्नचिन्हही दिलेले नाही ! उद्‌गारवाचकचिन्ह दिले आहे! आपल्याला काय वाटेल तो अर्थ आपण लावा. प्रश्न आपल्या मनात असेल तर उत्तर शोधा. पूर्णविराम वाटत असेल तर पूर्णविराम द्या, पण उद्‌गार चिन्ह मात्र त्यांनी फार खुशीने त्यात टाकले आहे! त्यात दोन संतांच्या ओळी वेगवेगळ्या ठिकाणी दिलेल्या आहेत. त्या संत विचारात पुस्तकाचा सर्व सारांश येतो. समर्थ रामदासांच्या दोन ओळी आहेत.

अवगुण सोडिता जाती, उत्तम गुण अभ्यासिता येती

कुविद्या सोडून, चित्ती शहाणे विद्या.

स्वभाव बदलू शकतो, असे समर्थ रामदासांचे म्हणणे आहे. त्याच्याच बाजूला, अगदी तिथेच नाही, पण पुस्तकात इतरत्र आणखी दोन ओळी आहेत. त्या तुकारामांच्या असाव्यात असा अंदाज मला त्यांनी सांगितला, पण निश्चित नसल्यामुळे तिथे तुकारामांचे नाव लिहिलेले नाही.

आधी होती दासी पट्टराणी केली तिसी

तिचे हिंडणे राहिना मूळ स्वभाव जाईना.

तुकारामाचे म्हणणे असे आहे की, मूळ स्वभावाला काही औषध नाही आणि रामदासांचे म्हणणे आहे की, तसे नाही. तेव्हा ह्या दोन समर्थ साधूंमध्ये जी स्वभावाविषयीची प्रतिक्रिया त्यांच्या काळापासून चालू आहे, ती आजपर्यंत आपल्याही डोक्यात सुरु आहे.

स्वभाव म्हणजे नेमके काय? सर्वसाधारणपणे आपण जसा विचार करतो, वागतो आणि त्याची जी वैशिष्ट्ये आढळतात; त्याला आपण स्वभाव म्हणतो. हा स्वभाव कसा घडला जातो? त्याला मनाचे दोन किंवा तीन फॅक्टर्स किंवा तीन महत्त्वाच्या गोष्टी दिलेल्या आहेत. एक तर अनुवंश, दुसरी परिस्थिती आणि तिसरी म्हणजे स्वत: काही गोष्टी जात्याच जन्मजात आपल्यात आलेल्या असतात. आपला वर्ण आणि उंची, आपले एकूण व्यक्तिमत्त्व- त्यामध्ये अर्थातच बुद्धीचाही समावेश आहेच. आकलनाची शक्ती, काही रोग किंवा व्याधी

या आपल्या जीवनापासूनच आपल्याला मिळालेल्या असतात. संगीत किंवा तत्सम अशा दुस-या कला आहेत, त्याचेही बाळकडू आपल्याला तसेच जन्मजात मिळालेले असते. काही गोष्टी अशा आहेत की, त्या जन्मजात असल्यामुळे, त्यादृष्टीने स्वभावात फरक होणे फार मोठे कठीण काम आहे, हे सर्व साधारणपणे आपल्या शास्त्रानेसुद्धा मान्य केलेले आहे.

मला या संदर्भात एक सुधारणा सुचवायची आहे, मित्रांनो, आता या जन्मजात गोष्टीसुद्धा बदलायला लागल्या आहेत. त्याचे एक छान उदाहरण आपल्यासमोर ठेवतो. जपान या देशाची उंची म्हणजे देशाची उंची नाही, त्यांचे जे काही नागरिक आहे, त्यांची उंची फारच कमी असल्यामुळे त्या देशाने एक कार्यक्रम आखला आणि तब्बल वीस वर्षात जपानमध्ये, त्यांनी स्वतःची उंची दीड इंचाने वाढवून घेतली!

National Average Height was increased by  दीड इंच म्हणजे अनुवंशिक जे आहे, तेसुद्धा बदलू शकते. आपला तसा निर्धार असला पाहिजे; त्याचेच हे एक उदाहरण आहे; फार मार्मिक उदाहरण आहे. त्यामुळे त्यानंतरच्या ज्या गोष्टी आहेत त्या फार गौण आहेत. कारण आपण स्वतः ते आकलन केले आहे, संपादित केले आहे. साहजिकच **आपण स्वतः जर ठरवले तर नक्कीच कोणत्याही समस्या सोडवू शकतो. परिस्थितीजन्य जे गुण किंवा दोष आपल्यामध्ये निर्माण झालेले आहेत, ते आपण निश्चितपणे बदलवू शकतो आणि ते दोष परिस्थितीजन्यच असतात.**

आता प्रधान साहेबांनी जे उदाहरण दिले, ते नाटकातले उदाहरण आहे. जीवनातलेही तसेच उदाहरण असते, त्याबद्दल मला वाद घालायचा नाही. परंतु ते नाटकातील उदाहरण आहे, हेही मात्र सत्यच आहे. त्या वेळी आपला स्वभाव परिस्थितीमुळे तसा झाला किंवा बदलला असे आपण वाटून घेतो, वस्तुःस्थिती तशी नसतेच! स्वभावाची व्याख्या आणि त्याची व्याप्ती एका इंग्रजी वाक्यामध्ये किंवा क्वोटेशनमध्ये फार चांगली दिली आहे.

Watch your thoughts, they become your words;

Watch your words, they become your habits;

Watch your habits, they become your character;

Watch your character, that is your destiny;

यापेक्षा जास्त प्रगल्भ अशी व्याख्या आणि व्याप्ती स्वभाव या शब्दाला नाही.

मी त्यांना एक सुचविले की, निदान माझ्यासारख्या मराठी मातृभाषा नसलेल्या माणसांसाठी तरी आपण एक सुविधा करा. शब्द मराठीत वापरलेले आहेत, त्याची एक

Glossary of Terms म्हणून, त्यांचे लेखनात तितके इंग्रजी पर्याय आहेत, ते इथे द्या. कारण स्वभाव म्हणजे नेचर म्हणता? की, कॅरेक्टर म्हणता? जर कॅरेक्टर म्हणणार असाल तर फार मोठी गोष्ट आहे. नेचर म्हणणार असाल, तर साधी गोष्ट आहे. चारित्र्य बदलवणे शक्य आहे काय? स्वभाव बदलणे शक्य आहे काय? अगदी स्वच्छ उत्तर आहे, 'स्वभाव बदलणे शक्य आहे!' चारित्र्य बदलणे मात्र फार कठीण आहे ! परिस्थितीमध्ये ते कसे कठीण घडते, याची तीन चार उदाहरणे विचार करता माझ्या लक्षात आली.

वाल्याचा वाल्मिकी झाला. वाल्या कोळी आपल्याला माहिती आहे, त्याचा व्यवसाय कोणता होता? हे आपल्याला माहीत आहे, त्याची परिस्थिती काय होती? हे ही सगळ्यांना माहीत आहे, सर्वश्रुत आहे. काही घटना अशा घडल्या की, ज्यामुळे त्याचा वाल्मिकी झाला आणि वाल्मिकी होताना एक फार मजेदार अशी परिस्थिती निर्माण झाली. नारदांनी त्याला सांगितले की, 'कारे, तू एवढ्या लोकांना मारलेस त्यावेळी काय केले?' तो म्हणाला, 'एक एक माणसाला मारले, त्या त्या वेळी एक खडा मी त्या भांड्यात टाकला.' 'खडा टाकत असताना तू काय बोललास?' 'मरा ! मरा!,' असे बोललो. 'तू आता एक छोटेसे काम कर की, मरा मरा हेच म्हण, परंतु फार जलद रीतीने ते बोलत जा.' मरा मरा म्हणजे मरा. या शब्दातून 'राम' शब्द शेवटी त्याच्या तोंडी बसला आणि त्यातूनच वाल्याचा वाल्मिकी झाला!

परिस्थितीमुळे तो वाल्या झाला होता, पण त्यानंतर तो बदलला, त्याला परिस्थिती जबाबदार होती. त्याला एक समज आली, त्याच्या मनाला वाटले की, सगळे पाप मी करतो आहे त्याचे भागीदार कोणी नाही. परंतु पुण्याचे जे काही मी काम करतो, त्याचे भागीदार मात्र सगळे आहेत. या समजदारीपोटी किंवा या विषयाचे त्याला आकलन झाले म्हणून त्याला फार वाईट वाटले आणि त्याने तो व्यवसाय बंद केला.

वाल्मिकीप्रमाणेच कालिदासाचे दुसरे उदाहरण आहे. ते एक जगविख्यात कवी म्हणून प्रख्यात झाले, त्याआधी ते कोळ्याचा व्यवसाय करीत होते आणि एखादा असा माणूस जो रोज स्वतःचे पोट भरण्यासाठी केवळ लाकडे फोडायचे काम करतो, असा माणूस एवढा मोठी कवी कधी होऊ शकतो का? हो होऊ शकतो! ही वस्तुस्थिती आपल्यासमोर आहे. आपण कदाचित अतिशयोक्ती याला म्हणत असू, तर प्रश्न वेगळा आहे! परंतु जे काही आहे ते लिहिलेले आहे आणि तसे घडू शकते हे खरे आहे. या दोन्ही उदाहरणावरुन आपल्याला स्वभावात बदल होऊ शकतो हे स्पष्ट कळेल, अर्थात ही टोकाची उदाहरणे

आहेत, असेही आपल्याला वाटेल.

आपल्याला हे ही स्पष्टपणे समजू शकते किंवा दिसू शकते की, असे घडू शकते! पण त्याचबरोबर माझ्या आणखी एक गोष्ट लक्षात आली ती, दुर्योधनाचे काय हो? या दुर्योधनाला प्रत्येक वेळी, प्रत्येक माणसाने, प्रत्येक ठिकाणी नाटकामध्ये नव्हे तर, त्याला प्रत्येकवेळी क्षणोक्षणी सांगितले, त्याच्या नातेवाईकांनी सांगितले आणि घरच्या लोकांनी सांगितले. प्रत्यक्ष त्याच्या गुरुजींनीही सांगितले, आईने सांगितले, सर्वांनी सांगितले, पण त्याला काही फरक पडला नाही ! त्याला जे काही करायचे होते, ते त्याने केले; जे काही व्हायचे होते ते घडले! त्याला कदाचित प्रधान साहेबांनी सांगितल्याप्रमाणे परिस्थिती जबाबदार असेल असे म्हणावे लागेल, पण नाटकात जी पात्र रंगवली जातात, ती मनुष्य स्वभावाची प्रतीकेच असतात.

वनारसे साहेबांनी जे पुस्तके लिहिले आहे, त्याचे खूप चांगल्या प्रकारे निरूपण माझ्या आधीच्या वक्त्यांनी केले आहे आणि त्याच मुद्द्यांचा आढावा पुन्हा मी इथे आपल्यासमोर घ्यावा, असे मला वाटत नाही. उलटपक्षी या पुस्तकाच्या निमित्ताने मला आणखी नवीन काही सुचवावेसे वाटते, वनारसे साहेबांना मी सांगू इच्छितो की, मला सुचलेल्या विचारांचा एक भाग म्हणून काही गोष्टींचा निर्देश करतो. इथे व्यक्ती आणि कुटुंब यांच्या स्वभावाचा फक्त विचार केला आहे. जीवनात कुटुंब आणि आपण या पलीकडेही खूप गोष्टी आहेत. समाज हा फार मोठा, महत्त्वाचा घटक आहे आणि समाजामध्ये शासन फार मोठा, महत्त्वाचा घटक आहे.

मित्रहो, शासनाला स्वभाव असतो का? आणि शासनाचा स्वभाव बदलू शकतो का? हे दोन विषय प्रकर्षाने माझ्या लक्षात आले. मी त्याबाबत विचार करायला सुरुवात केली. शासनाला स्वभाव असतो का? विचार करता करता लक्षात आले की, केवळ शासनालाच नव्हे तर, गावालासुद्धा एक स्वभाव असतो. पुणे हे एक शहर आहे, गाव आहे; त्याला एक स्वभाव आहे. त्याची एक इमेज आहे! कारण तत्त्वांचा प्रश्न! तत्त्व हा तर अनेकांच्या दृष्टीने मूलभूत प्रश्न. तत्त्वाचा प्रश्न तर सगळ्यांच्या समोर उभा असतो! 'माझ्या घरातला कचरा महानगरपालिकेने उचलून किंवा ओढून नेला नाही, तर मी काही त्याला हात लावणार नाही.' असे कुणी म्हणत असेल तर तो त्याच्या दृष्टीने तत्त्वाचा प्रश्न आहे. महानगरपालिकेचे काम आहे, पण परिसरात घाण साचते आहे ना! त्या घाणीचे काय? अस्वच्छतेमुळे वास तुला येतो आहे. आरोग्याचे प्रश्न तुझे निर्माण होतील. तर हे असे आहे. असू द्या स्वभाव



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book1_1-28

आहे. प्रत्येक शहराला एक स्वभाव आहे! शहराचे नाव आपण उच्चारले, तरी आपल्यापुढे प्रतिकृती तयार होते, कारण त्या त्या शहराची महानगराची विशिष्ट प्रतिमा आहे ! त्यातही शहराचा, स्वतःचा स्वभाव मनातला आणि जगातला, असे त्याचेही दोन भाग करता येतील.

पुणेकरांना माहीत आहे, आपण काय आहोत! परंतु जळगावकरांना हे माहीत नाही की, पुणेकर काय आहेत ! तेव्हा जळगावकरांना जे माहिती असते, ते फक्त वाचून माहिती असते की, पुणे येथे विद्यापीठ आहे. पुणे विद्येचे माहेरघर आहे. आता पुण्यात काय चालले आहे हे इथे आल्यावरच कळले मला. जगातले मला माहीत आहे, मनातला स्वभाव मात्र मला माहिती नाही! म्हणजे अशा रीतीने शहरालासुद्धा स्वभाव असतो आणि तो स्वभाव बदलू शकतो का? त्याचेही उत्तर आपण शोधून काढले पाहिजे.

आता शासनाबद्दल काही सांगतो. इतर विचारांवर, वनारसे साहेबांनी स्वतंत्रपणे तीन नवीन पुस्तके लिहावीत, अशी मी त्यांना विनंती करतो. शासनाला स्वभाव असतो का? स्वभाव बदलू शकतो का? हा विषय त्यांनी जरूर हाताळावा. समाजाला स्वभाव असतो का? आणि तो स्वभाव बदलतो का? हे ही जरूर त्यांनी हाताळावे, असेही मला, त्यांना आवर्जून सांगायचे आहे.

शासनाला स्वभाव असतो असे मला वाटते. शासनाच्या स्वभावाची जी काही वैशिष्ट्ये आहेत, ती कोणती? शासन सर्वसाधारणपणे तीन कामे फार चांगल्या प्रकारे करु शकते आणि त्यातच त्यांचा स्वभाव ओळखून येतो. तीन कामे कोणती ? कायदा, सुव्यवस्था आणि संरक्षण या तीन कारणांसाठी, शासन या संस्थेचा उदय झाला. या तीनही गोष्टी त्याच्या स्वभावाचा मोठा भाग म्हणून आपल्या सगळ्यांना ज्ञात आहेत. सगळ्यांनी बहुतांशी मान्यता दिलेली गोष्टही आहे की, या संदर्भातील प्रत्येक कामे शासनानेच केली पाहिजेत. सर्वांना समान संधी उपलब्ध करुन देण्याचे काम शासनाशिवाय दुसरे कोण करू शकेल? शासनासारख्या मोठ्या संस्थेने अशी कामे केलीच पाहिजेत, आपण सर्वांनीच हे मान्य केले आहे.

पुढे परिस्थितीजन्य अशा काही गोष्टी शासनाने स्वतःकडे ओढून घेतल्या. जनहिताच्या नावाखाली, शासनाने जनतेवर कर लादले. जनहिताच्या नावाखाली, शासनाने स्वतःकडे अनेक कार्यक्रम राबवण्याचा मक्ता घेतला. जनहिताच्या नावाखाली, वेगवेगळे अगदी हेअर कटिंग सलून पासून, तर स्टील कारखान्यापर्यंत, सगळे उद्योग आणि व्यवसाय शासनाने करायला सुरुवात केली. हे बसण्यासारखे होते का त्यांच्या स्वभावात? परिणाम काय घडले?

मित्रांनो, शासनाच्या स्वभावाची ही वैशिष्ट्ये सर्वांना परिचित आहेतच. शासन कोणतेही काम करत असेल, तर त्याला एक प्रकारचे कायम स्वरूप येते. त्यामध्ये काही बदल होण्याची शक्यता फार कमी असते. बांगलादेश युद्धाच्यावेळी तिकीट लावले गेले होते, कर लावला गेला होता, तो बांगलादेशाचे युद्ध संपल्यानंतरही किमानपक्षी बारा वर्षे चालू होता.

एखादा पूल बांधताना टोल म्हणून सरकार वसूल करते. पूल बांधून त्याचे लाईफ संपेपर्यंत किंवा तो पूल पडून परत नवीन बांधण्यापर्यंत, तो कर चालू असतो. कारण सरकार! सरकार जे काही काम करेल, त्याला एक कायम स्वरुप प्राप्त होते. दुसरी गोष्ट घडते. शासन जे काही काम करत असेल त्यामध्ये नीतिमत्तेची भावना येते. आपल्या धोरणामुळे लोकांचे काय होईल? आपण जर असे केले, तर लोकांना खूश करता येईल का? का लोक नाखूश होतील? असे सर्व विचार करून शासन अनेकदा मूळ कृतीच करत नाही. त्यामुळे जे काही आहे ते पूर्वीप्रमाणेच चालू राहते. पूर्वी प्रमाणेच कामे करीत रहाणे, यातूनसुद्धा स्वभाव बनतो. तिसरी गोष्ट शासनाला बाय व्हेरी बाय द कॉन्स्टीटयूशन, म्हणजे त्यांचा जो, मूळ स्वभाव आहे, त्यांची जी रचना आहे, घडण आहे, त्यामध्ये विविध जे वर्ग आहेत त्या समाजाच्या विरुद्ध पक्षाच्या किंवा परस्पर विरुद्ध अशा मूल्यांची आणि त्यांनी त्यांची काळजी वाहायला पाहिजे असे दाखवायचे असते.

शासन प्रत्येक वेळी जे जे काम करते त्यामध्ये त्यातूनच अनेकदा राजकारण निर्माण होते. कोणतीही गोष्ट त्यामुळे शासन सरळमार्गी करु शकत नाही, कारण वरपक्षी त्यांना हे दाखवायचे असते की, ते सरकार श्रीमंतांचे नाही. त्यांना श्रीमंताशिवाय भागत नाही, हे माहिती असते आणि गरिबांच्या नावाखाली ते श्रीमंतांचे भले करीत असतात! असे जर घडले नसते तर समाजातील ही तफावत,हा ताण, ही विषमता निर्माणच झाली नसती. **आपले हेतू जर स्पष्ट असतील, तरच आपले अंतिम उद्दिष्ट सफल होते, तुमचे मार्ग सरळ होतात.** परंतु असे दिसून येते की, मूळ उद्देशामध्येच अनेकदा गोंधळ असतो.

बोलायचे काय आणि वागायचे काय, अशा वेगळ्या पद्धतीचे व्यवहार असल्यामुळे, सर्वांनाच खूश करण्याचा हेतू असल्यामुळे, त्यांचे कोणतेही प्रकल्प यशस्वी होत नाहीत. याची जाणीव शासनाला कधी होते का? प्रस्तुत पुस्तकात म्हटले आहे की, 'त्यांनी आत्मसंशोधन करायला पाहिजे.' आत्मसंशोधन ते केव्हा करतील? समाजाने त्यांना जाणीव करून दिली की, अहो आपले हे चुकते आहे आणि त्यांना त्यांची योग्य जागा दाखवली तर ते ताबडतोब आत्मसंशोधनाला सुरुवात करतील. असे काही होण्याची शक्यता आता निर्माण झाली

आहे, असे मी ऐकतो.

पण मित्रांनो, आपण विचार करा की, अशी आत्मसंशोधनाची वेळ त्यांच्यावर आणली तरच ते आत्मसंशोधन करतात, नाहीतर ते आत्मसंशोधन करीत नाही. जसे आहे तसे काम सुरु ठेवतात. शासनाचे मुख्य दोन घटक आहेत. धोरण ठरवणारे असतात,नियम बनवणारे असतात तसेच त्या धोरणांच्या अंमलबजावणीचे काम करणारे असतात. ही धोरणे अंमलबजावणीत आणताना नोकरशाहीचा विचार करावा लागतो. ही नोकरशाही आणि राजकारणी लोक, हे दोन वर्ग, दोन मुख्य घटक शासनाचे आहेत. सरांनी जर या विषयावर पुस्तक लिहायचे ठरवले, तर त्यांना ह्या दोन्ही घटकांचा सखोल अभ्यास करावा लागेल. त्यांना या अभ्यासासाठी थोडीफार मदत मी करु शकतो.

शासकीय सेवेत माझे काही मित्र आहेत, त्या शासकीय अधिका-यांची ओळख किंवा भेट मी करुन देईन. आपण त्यांची मुलाखत घ्या,त्यांच्याशी चर्चा करा. अशा काही व्यवस्था मी करु शकतो. मित्रांनो, या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करणे फार गरजेचे आहे, तसे केले तर शासन या संस्थेचा स्वभाव फार जवळून कळेल, याचा अर्थ आता आपण कसा घेतो हे अर्थातच आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. शासनाच्या स्वभावामध्येही बदल घडू शकतो, नाही तसे नाही! शासनाच्या स्वभावामध्ये बदल एकदम घडणार नाही, हे खरे आहे, पण हळूहळू निश्चितच बदल घडेल.

समाजाच्याही स्वभावामध्ये हळूहळू बदल घडतो आहे. गेल्या तीस वर्षांमध्ये स्त्रियांना मिळालेले स्वातंत्र्य, गेल्या तीस वर्षांमध्ये सर्वसाधारण माणसाला मिळालेली प्रतिष्ठा, गेल्या तीस वर्षांमध्ये 'सरकार सार्वभौम आहे' हा विचार प्रस्थापित झाला होता. सरकारने सर्व गोष्टी केल्या पाहिजे, सगळ्या गोष्टी सरकारच करु शकते किंवा शासनच करु शकते. या सर्व गोष्टींचा विसर पडून, आपण आता या विचारावर पोहचत आहोत की, 'शासनाने अगदी कमीत कमी माझ्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनामध्ये ढवळाढवळ केली तरच, माझे जीवन जास्त सुखी होईल,' या विचारापर्यंत आपण पोहचलो आहोत आणि त्यामधूनच उदारीकरण आणि खाजगीकरण ह्या कल्पना पुढे आल्या आहेत. मला असे वाटते की, शासनाच्या किंवा सरकारच्या अशा स्वभावातसुद्धा बदल घडतात, घडून येतात आणि घडवलेही जातात! हे घडवण्यासाठी किंमतही मोजावी लागते.

मित्रांनो, इथे फार छान वाक्य, या पुस्तकामध्ये लिहिलेले आहे की, 'तुम्हाला जे काही करायचे असेल, त्याची तुम्हाला किंमत मोजायला पाहिजे आणि जर तुम्हाला काहीही

न करता काही साध्य करायचे असेल म्हणजे दुस-या शब्दात सांगायचे, तर तुम्हाला दुस-यांच्या कामाची चोरी करायची असेल तर स्वत:ला चोर म्हणूनच संबोधायला पाहिजे! तसे आपण तुम्ही करणार नसाल, बदल घडवून आणायला आपण तयारच नसाल, तर आपल्याला दुसरा काही पर्याय नाही.' 'प्रत्येक वेळी योग्य पर्यायाचा विचार करून आपण वागलात, तरच आपण यशस्वी जीवन जगू शकाल,' असा फार महत्त्वाचा संदेशही ह्या पुस्तकामध्ये दिला आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने सरांनी मला येथे बोलवले आणि आपल्या सगळ्यांच्या समोर दोन गोष्टी सांगण्याची संधी प्राप्त करून दिली, त्याबद्दल मी त्यांचे आणि आपल्या सर्वांचे आभार मानतो. माझे दोन शब्द संपवतो.

जय हिन्द! जय महाराष्ट्र!